# देवपूजेपूर्वीची सिद्धता (शास्त्रासह)

## विषयसूची

१. संकलक आणि काही सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते साधक यांचा परिचय ६

२. आध्यात्मिक परिभाषेतील वैशिष्ट्यपूर्ण प्रस्तावना ! ९

३. मनोगत १२

## ग्रंथाची अनुक्रमणिका

**(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)**

**१. देवपूजेसंबंधीची पंचकर्मे १५**

**२. देवपूजेची सिद्धता (अर्थ, महत्त्व, लाभ आणि क्रम) १५**

**३. देवपूजेपूर्वीच्या सिद्धतेची (तयारीची) प्रत्यक्ष कृती १७**

**४. देवपूजेपूर्वीच्या सिद्धतेच्या संदर्भातील कृतींमागील शास्त्र २२**

४ अ. स्तोत्रपठण किंवा नामजप करणे २२

४ आ. पूजास्थळाची शुद्धी अन् पूजेच्या उपकरणांची जागृती करणे २५

४ इ. रांगोळी काढणे ३०

४ इ ३. देवतेच्या तत्त्वाशी संबंधित रांगोळी का काढावी ? ३१

४ इ ५. रांगोळी काढल्यावर तिच्यावर हळदी-कुंकू का वहावे ? ३३

४ ई. शंखनाद ३४

४ उ. आसनग्रहण ३९

४ उ २. योग्य आणि अयोग्य आसने ४१

४ उ ३. पातळीनुसार वापरावयाची आसने ४१

४ उ ४. पूजकाच्या पाटाभोवती रांगोळी काढावी कि काढू नये ? ४२

४ ऊ. आचमन करणे ४३

४ ए. देवतांवरील निर्माल्य काढणे ४५

४ ए १. निर्माल्य अंगठा आणि अनामिका यांनी का उचलावे ? ४५

४ ए ३. निर्माल्य काढल्यानंतर त्याचा वास का घ्यावा ? ५०

४ ए ४. देवतेवरून काढून वास घेतलेले निर्माल्य आपल्या डाव्या हाताला (बाजूला) का ठेवावे ? ५०

४ ऐ. आचमन, प्राणायाम, देशकाल उच्चार, संकल्प अन् न्यास ५३

४ ऐ १. आचमन करतांना पाणी पिण्याचा ध्वनी का करू नये ? ५३

४ ओ. कलश, शंख, घंटा आणि दीप यांची पूजा करणे ५८

४ ओ १. कलश, शंख, घंटा व दीप यांची या क्रमाने पूजा का करतात ? ५८

४ ओ ३. उपकरणांवर गंध, अक्षता आणि फूल एकत्रितपणे का वहावे ? ५९

४ ओ ५ अ. शंखाला अक्षता का वाहू नयेत ? ६१

४ ओ ६ अ. घंटेच्या पूजेत तुळशीपत्राचा उपयोग का केला जात नाही ? ६२

४ ओ ७ अ. दीपपूजन करतांना दीपाला अन्य घटकांसह हळदी-कुंकू का वाहिले जाते ? ६२

४ औ. पूजासाहित्य आणि पूजास्थळ यांची अन् स्वतःची शुद्धी ६३

४ अं. देवतांच्या मूर्ती आणि चित्रे यांची स्वच्छता ६५

**५. पूजकाने पूजासाहित्याची रचना स्वतःच्या जवळ करणे का योग्य ?** ६९

**६. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी केवळ देवपूजा नाही, तर त्यापुढील टप्प्याची साधना करणे आवश्यक** ७०

**७. देवतांचे विडंबन रोखणे, ही काळानुसार आवश्यक उपासना !** ७०

**卐 काही आनुषंगिक सूत्रे** ७२

## विषयसूचीतील क्रमांक ३

# मनोगत

नित्य ईश्वरोपासना घडावी यासाठी धर्माने घालून दिलेली एक सोपी आचारपद्धत म्हणजे 'देवपूजा'. देवपूजेमुळे मनात भक्तीभावाचे केंद्र निर्माण होते, देवतेची कृपादृष्टी होते, घरातील वातावरण सात्त्विक बनते, तसेच भावी पिढीवर धार्मिकतेचा संस्कार होण्यासही साहाय्य होते. देवपूजेपूर्वीची सिद्धता (तयारी) हा देवपूजेचा पाया आहे. देवपूजेपूर्वीच्या सिद्धतेमुळे पूजकाची शुद्धी तर होतेच, तसेच तो पूजेतून प्रक्षेपित होणारे चैतन्य ग्रहण करण्यास समर्थ बनतो; म्हणूनच देवपूजेची सिद्धता (तयारी) अत्यावश्यक आहे.

धार्मिक कृती हा एक प्रकारे अध्यात्मशास्त्रातील वैज्ञानिक प्रयोगच असतो. कोणताही प्रयोग करायचा असेल, तर तो नेमक्या पद्धतीने करावा लागतो. धार्मिक कृतीच्या संदर्भातही असेच आहे. योग्य पद्धतीने धार्मिक कृती केली, तरच आपल्याला योग्य फलप्राप्ती होते त्यासाठी धार्मिक कृतीमागील शास्त्र जाणून घेणेही तेवढेच महत्त्वाचे ठरते. शास्त्र जाणून घेऊन कृती केल्यामुळे श्रद्धेची निर्मिती होते. तसेच 'सत्कर्म जर अशास्त्रीय पद्धतीने केले, तर त्या कर्मामुळे अल्पांशाने का होईना मिळणारे फळ अशास्त्रीय लोकांना मिळते', असे धर्म सांगतो. यासाठी धार्मिक कृती शास्त्रानुसार होणेच आवश्यक ठरते. वरील दृष्टीकोन समोर ठेवून या ग्रंथात देवपूजेपूर्वीची सिद्धता (तयारी) आणि तिच्यामागील अध्यात्मशास्त्र यांसंबंधी विवेचन केले आहे.

पूजेपूर्वी स्तोत्रपठण, मंत्रजप आणि नामजप करण्याचे महत्त्व; पूजास्थळ अन् उपकरणे यांची शुद्धी; देवतेच्या तत्त्वाशी संबंधित रांगोळी काढणे; देवपूजेला बसण्यासाठी घ्यावयाच्या आसनांचे विविध प्रकार; देवतांवरील निर्माल्य काढण्याची आणि देवतांची चित्रे अन् मूर्ती पुसण्याची योग्य पद्धत

इत्यादी माहितीसह प्रत्यक्ष पूजेला प्रारंभ करण्यापूर्वी आचमन, प्राणायाम, देशकाल उच्चार, संकल्प आणि न्यास करण्याचे, तसेच कलश, शंख, घंटा अन् दीप यांच्या पूजनाचे महत्त्वही या ग्रंथात सांगितले आहे.

या ग्रंथाच्या वाचनाने पूजेपूर्वीच्या सिद्धतेचे महत्त्व पूजकाच्या लक्षात येऊन त्याच्याकडून ती भावपूर्ण होवो आणि त्यामुळे त्याला पूजेतून अधिकाधिक चैतन्याची प्राप्ती होवो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

## परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांच्या नावांआधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण

नाडीपट्टीवाचनाच्या (नाडीभविष्याच्या) माध्यमातून सप्तर्षी सनातनला मार्गदर्शन करतात. १३.५.२०२० या दिवशी सप्तर्षींनी सांगितले, 'यापुढे सद्गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ यांना 'श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ' आणि सद्गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांना 'श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ' असेच संबोधावे; कारण या नावांतून दोघींना देवीतत्त्व मिळेल, तसेच याचा लाभ त्यांच्या नावांचा उल्लेख करणाऱ्यांनाही होईल.' सप्तर्षींच्या आज्ञेनुसार तसे संबोधणे चालू केले आहे. यांच्या नावातील संबोधनाविषयी परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी सांगितले, ''श्रीसत्‌शक्ति' ही भगवंताच्या शाश्वत स्वरूपाशी संबंधित आहे आणि 'श्रीचित्‌शक्ति' ही भगवंताच्या वैश्विक ज्ञानाशी संबंधित आहे.''

**टीपा** १. ग्रंथात दिलेल्या सूक्ष्म चित्रात विविध स्पंदने दर्शवल्याने त्यातील मूळ रेखाचित्र सुस्पष्ट दिसत नाही. असे मूळ रेखाचित्र चित्राआधी देण्यात आले आहे.

२. या ग्रंथात अन्य संदर्भग्रंथ, तसेच लिखाण यांतून काही विषय (मुद्दे) घेतले आहेत. अशा विषयांच्या अंती लहान अक्षरांत कंसात संदर्भक्रमांक घातले आहेत. त्याचे विवरण ग्रंथाच्या शेवटी 'संदर्भसूची'मध्ये दिले आहे.